नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/११/२०२४ (रविवार) सकाळ

# आगामी विधानसभा निवडणुका शांततेने पार पाडण्याकरीता पोलीस स्टेशन बेला यांनी केला रूटमार्च

सध्या येता काही दिवसात आगामी विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्याकरीता पोलीस विभागातर्फे सर्व जनतेला विधानसभा निवडणुक काळात आंचार संहिता लागु असुन आचार संहितेचा भंग होणार नाही तसेच निवडणुका तसेच आगामी सण दिवाळी शांततेत पार पाडण्याचे दृष्टीकोणातुन मा. श्री. सी.बी. चौहाण ठाणेदार बेला यांचे मार्गदर्शनात मौजा बेला येथे पोलीस स्टेशन बेला येथील पोउपनि खंडेराव बोळगिर, पोलीस हवालदार दारासिंग राठोड, प्रविण नैनवार, अमोल काळे असे ०२ पोलीस अधिकारी व १० पोलीस अंमलदार हजर होते. तसेच होमसैनिक दलाचे ५४ जवान यांनी सदर रूटमार्च पार पाडला.

मा. ठाणेदार श्री. सी. बी. चौहाण साहेब यांनी नागरिकांना विधानसभा निवडणुक काळात शांतता राखण्याचे आव्हान केले तसेच सोशल मिडीया वापराबाबत जनजागृती केली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर